# गडचिरोलीतील दडवलेल्या आदिवासी बालमृत्यूंची कहाणी

डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग

चार वर्षांपूर्वीची गोष्ट. संध्याकाळी घरी बसलो होतो. गडचिरोली जिल्ह्याच्या धानोरा या आदिवासी तालुक्यातील जंगलात आमचे आदिवासी रुग्णालय व संस्थेचा परिसर आहे. ग्रामीण-आदिवासी भागातील आरोग्याच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर मार्ग शोधणे हा हेतू असल्याने आमच्या परिसराला आम्ही नाव दिलं आहे - शोधग्राम. अचानक एक आई व आजी कपड्यात गुंडाळलेल्या आजारी मुलाला घेऊन घरात शिरले. मूल चार महिन्यांचं असेल पण अतिशय बारीक व सुकलेलं. आचके देत बेशुद्ध पडलेलं होतं. स्टेथोस्कोप छातीवर ठेवला - छाती बुडबुडणाऱ्या आवाजांनी भरलेली होती. पाच मिनिटातच ते मूल आमच्या घरी बिछान्यावरच दगावलं. काहीच करु शकलो नाही. वाईट वाटलं. सोबतच, अशा शेवटच्या क्षणी मुलाला आणून असं हतबल केल्याबद्दल मनातला डॉक्टर कष्टीही झाला. आतापर्यंत काय केलं बायांनो तुम्ही ?

शोधग्रामहून चार-पाच किलोमिटर अंतरावरल्या जंगलातल्या गावात त्या राहात होत्या. काही तास अगोदर आल्या असत्या तर मूल कदाचित वाचवता आलं असतं. आणि काही दिवस अगोदर आल्या असत्या तर नक्कीच वाचवता आलं असतं. हे आदिवासी असं का करतात ?

भांबावलेल्या त्या दोघींच्या रडत सांगण्यामधून जी कहाणी उलगडली ती अशी. त्या आईचं हे तिसरं मूल होतं. पहिली दोन्ही मुलं मेल्यामुळे हे मोठं मोलाचं बाळ होतं. जन्मतांनाच ते बारीक जन्माला आलं. घरी दारिद्य्र, गरोदरपणात आईला घडणारा अर्धा उपवास - नवरा दारुडा होता - आणि वारंवार होणारा मलेरिया. त्यामुळे आईच स्वत: कुपोषित. शिवाय गरोदर बाईने पोटभर खाल्लं तर मूल धष्टपुष्ट जन्माला येतं, ("गर्भ पोकतो") व बाळंतपण अडतं हा समज आहे. त्यामुळे बायांना गरोदरपणात मुद्दाम उपाशी ठेवतात. बाळाचं कुपोषण गर्भाशयातच सुरु होतं.

मूल जन्मल्यावर पहिले तीन दिवस इथल्या रिवाजाप्रमाणे त्या बारक्या बाळाला आईचं दूध पाजलं नाही. दुर्दैवाने त्यानंतर आईला पुरेसं दूध आलं नाही. म्हणून मोठ्या सायासाने बकरीचं दूध मिळवून त्यात तीनपट पाणी टाकून ते दूध घाणेरड्या शिशीला कपड्याचा बोळा लावून त्याने बाळाला पाजत राहिले. बाळ अर्धवट उपाशी. आता वरुन हगवण सुरु झाली. म्हणून ते दूधही बंद करुन शेजारच्या सल्ल्यानुसार आठवडी बाजारातून साबुदाणा आणून निव्वळ त्याचं पाणी पाजायला सुरवात केली. मूल दिवसेंदिवस मरतुकडं व्हायला लागलं. म्हणून वैदूचं औषध केलं. देहाऱ्याचा (मांत्रिक) मंत्र वगैरे सर्व झालं. फायदा नाही.

मुलाने रखडत चार महिने काढले पण मग धापा टाकायला लागलं. छाती आत ओढायला लागली. न्युमोनिया झाला असावा. पुन्हा मंत्र तंत्र केले. पैसे उसने घेऊन कोंबडंही कापलं. तिसऱ्या दिवशी मूल बेशुद्ध झालं. म्हणून आमच्या रुग्णालयात दाखवायला सकाळी दोघी बाया घरुन निघाल्या. बाप दारुच्या नशेत गुंग पडून होता. त्याला फिकीर नाही. दवाखाना चारच